महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डब्ल्यूइबी १०२०/सी.आर.२६/२०२१/मा.तं. दिनांक-५ जुलै, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, गट अ आणि सहायक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, गट ब-अर्जातील दाव्याच्या अनुषंगाने अनुभव प्रमाणपत्र सादर करण्याबाबत**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०१८/२०२२ व ०१९/२०२२**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, गट अ आणि सहायक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, गट ब या संवर्गासाठी दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रसिध्द जाहिरातीस अनुसरुन विषयांकित पदासाठी ज्या उमेदवारांनी आयोगास अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांना अर्जासोबत कागदपत्रे/ प्रमाणपत्रे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. तथापि, सदर कागदपत्रे /प्रमाणपत्रे यामध्ये अनुभव प्रमाणपत्र अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने अर्ज केलेल्या उमेदवारांकडून अनुभव प्रमाणपत्र सादर करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव, दिनांक १ जून, २०२३ रोजी प्रसिध्द चाळणी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीस पात्र उमेदवारांना बाह्यदुव्याद्वारे अनुभव प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. अनुभव प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' अंतर्गत 'Certificate Upload' या मेनूमध्ये दिनांक १० जुलै, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत उपलब्ध असेल. विहित कालावधीत सदर बाह्यदुव्याद्वारे अनुभव प्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांचा प्रस्तुत पदाच्या निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाईल, याची संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. अनुभव प्रमाणपत्राचा विहित नमुना आयोगाच्या संकेतस्थळावरील 'DOWNLOADS' या सदरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

४. अनुभव प्रमाणपत्र सादर करण्यात कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर किंवा support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन आवश्यक तांत्रिक मदत प्राप्त करुन घेता येईल.

ठिकाण- नवी मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग